सिंधुदुर्ग पुढारी मंगळवार ३१ मार्च २०१५

# पर्यावरण संवर्धनासाठी जनतेची चळवळ आवश्यक : खा. राऊत

दोडामार्ग : वार्ताहर

विनाशकारी प्रकल्पामुळे कोकणचे सौंदर्य, पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. पर्यावरणाचे जतन केलं तरच आपण चांगले जीवन जगू शकतो. यासाठी पर्यावरण संवर्धनासाठी केवळ चर्चासत्रातून नव्हे तर सर्व सामान्यातून चळवळी उभी राहिली पाहिजे, असे प्रतिपादन खा.विनायक राऊत यांनी केले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात भारतीय सामाजिक शास्त्रे अनुसंधानपरिषद, मुंबईच्यावतीने 'पश्चिम घाट जागतिक वारसा पर्यावरण आणि विकास' या विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था चेअरमन अभिजित हेगशेटये होते. प्रा. डॉ.व्ही. यु. पाटील, प्रा.डॉ.राजेंद्र केरकर, डॉ. हेमंत पेडणेकर, डॉ. एस. यु. ठाकूर, भाई परमेकर, बाबुराव धुरी, सुचन कोरगावकर, विवेकानंद नाईक उपस्थित होते.



दोडामार्ग : चर्चासत्रात बोलताना खा. विनायक राऊत. सोबत संस्थाध्यक्ष अभिजीत हेगशेटये, प्रा. डॉ. व्ही. यु. पाटील व अन्य. (छाया : रत्नदीप गवस)

खा.राऊत म्हणाले, बालपणातले कोकण आणि आताचे कोकण पाहीले तर मन खिन्न होते. गाडगीळ व कस्तुरीरंगन समिती अहवालाविषयी बोलताना म्हणाले, विकासाच्या व वेगवेगळ्या योजनांच्या नावाखाली कोकणातील निसर्गाची लूट केली जात आहे. गाडगीळ समितीने अभ्यास करून पर्यावरणातील जैवविविधतेच्या भवितव्यासाठी अहवाल तयार केला. परंतु इतरांनी त्याचा विपर्यास करून अहवालासंदर्भात लोकांच्या मनात तिरस्कार निर्माण करण्याचा प्रयत्न केला. कोणत्याही पर्यावरण संवर्धन करणाऱ्या संस्थेने पर्यावरण विकासासाठी सुचविलेल्या चांगल्या गोष्टी सरकारने स्वीकारल्या पाहिजेत. पार्यावरणाचे संरक्षण करणे हे शासनकर्त्यांचे कर्तव्य आहे. शासनकर्त्यांची भूमिका ही कुटुंब प्रमुखांची असली (पान २ वर)

पान १ वरून

## पर्यावरण संवर्धनासाठी जनतेची चळवळ आवश्यक : खा. राऊत

पाहिजे. पण तसे ते दिसत नाही. कोकणातले जीवन हे संपूर्ण निसर्गावरच अवलंबून आहे. उपलब्ध साधन सामुग्रीचा वापर करून आपल्याला जगलं पाहीजे. इकोसेन्सेटीव्ह, मोरोटोरीयम यामधील सत्य लोकांना समजावून सांगितले पाहिजे. एकीकडे पर्यावरणाचे रक्षण करायचे व दुसरीकडे घातक प्रकल्प आणावयाचे असे दुटप्पी धोरण राबवू नये असेही मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षपदावरून संस्थाध्यक्ष अभिजित हेगशेटये म्हणाले, निसर्गाचा समतोल तुटत चालला आहे. मानवी जीवनाशी निसर्ग हा निगडीत आहे. निसर्गावर आधारित अनेक रोजगार उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल साधून उपलब्ध साधनांचा वापर करून रोजगार निर्मिती करावी. पहिल्या सत्रात पर्यावरण तज्ज्ञ राजेंद्र केरकर यांनी सांस्कृतिक पर्यावरणावर व्याख्यान दिले. तर दुसऱ्या सत्रात केरळचे प्रा. व्ही. सनलकुमार यांनी पश्चिम घाट सांस्कृतिक वारसांचा शोध या विषयावर व्याख्यान दिले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. पी. डी. गाथाडे, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. पाटील तर आभार प्रा. एस. एन. खडकर यांनी मानले.